महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२ ई, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६
दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जा.क्र.तंशिविकापु/लले/कार्य.अह/२०२१-२२/२०२२/ २७५ दिनांक : 30/08/2022

प्रति,

संचालक/प्राचार्य
शासकीय संस्था, पुणे विभाग.

**विषय - सन २०२१-२२ या कालावधीतील राजपत्रित अधिका-यांच्या कार्यमुल्यमापन अहवालाबाबत.**

संदर्भ -१. या कार्यालयाचे आदेश क्र. तंशिविकापु/लले/का.अ/२०२२/१४४, दि.१०.०६.२०२२.
२. संचालनालयाचे पत्र क्र. १(२)/गो.अ./२०२२/१३३, दि.२९.०८.२०२२.

तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, पुणे या कार्यालयाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय संस्थांना **गट अ व गट ब (राजपत्रित)** अधिका-यांचे सन २०१९-२० व २०२०-२१ या प्रतिवेदन वर्षातील कार्यमुल्यमापन अहवाल ऑफलाईन पध्दतीने व सन २०२१-२२ या प्रतिवेदन वर्षातील कार्यमुल्यमापन अहवाल महापार प्रणालीत ऑनलाईन पध्दतीने दि. ३०.०७.२०२२ पर्यंत सादर करणेबाबत संदर्भ क्र.१अन्वये सूचित करण्यात आलेले आहे.

या कार्यालयाचे स्तरावरुन आपणास कार्यमुल्यमापन अहवाल महापार प्रणालीत ऑनलाईन पध्दतीने सादर करणेबाबत वेळोवळी सूचना देऊन सुध्दा सदरची कार्यवाही अद्यापर्यंत पूर्ण झालेली नसल्याचे दिसून येते. सदरची कार्यवाही विहीत मुदतीत आणाकडून पूर्ण का करण्यात आली नाही याबाबतचा खुलासा दि.०१.०९.२०२२ दुपारी १२.०० पर्यंत सादर करावा. तसेच आपल्या संस्थेतील गट-अ व गट-ब मधील सर्व अधिका-यांचे कार्यमुल्यमापन अहवाल महापार प्रणालीत ऑनलाईन पध्दतीने पूर्ण करण्याची कार्यवाही पुढील ८ दिवसात पूर्ण करावी.

(डॉ. दत्तात्रय व्यं. जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, पुणे

प्रत-१. सर्व शासकीय संस्थाप्रमुख पुणे विभाग यांना आवश्यक कार्यवाहीसाठी.
२. प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याकरीता.

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४६०/२१,
ई-मेल-desk1@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक: १(२)/गो.अ./२०२२/ 133 दिनांक: 29/08/2022

प्रति,
१. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई,पुणे, नाशिक , औरंगाबाद, अमरावती, नागपूर.
२. संचालक,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.

विषय :-तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील कार्यरत राजपत्रित अधिकाऱ्यांचे सन २०२१-२२ चे महापार प्रणालीवरील प्रलंबित कार्यमूल्यमापन अहवालाबाबत..

संदर्भ :- १. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. संकीर्ण-१११८/प्र. क्र. २४/ १८/तांशि-७, दिनांक ३१ मे, २०२२.
२. संचालनालयाचे पत्र क्र. १(२)/गो.अ.२०२२/८५ , दिनांक ०९ जून, २०२२
३. संचालनालयाचे पत्र क्र. १(२)/गो.अ.२०२२/११५ , दिनांक २२ जुलै, २०२२
४. संचालनालयाचा दिनांक २५ /०८/२०२२ रोजीचा मेल..

संदर्भ क्र. ०१ च्या शासन निर्णयायन्वये सूचित केल्यानुसार संदर्भाधिन ०२ च्या पत्रान्वये गट-अ व गट-ब मधील अधिकारी यांचे सन २०२१-२२ चे वार्षिक गोपनीय अहवाल महापार प्रणालीत ऑनलाईन पध्दतीने भरण्याबाबत सूचित करण्यात आले होते. तसेच सदर प्रणालीत कार्यवाही करताना काही तांत्रिक अडचणी उदभवल्यास महापार प्रणालीचे तत्रंज्ञ यांचेशी संपर्क साधण्याबाबत कळविण्यात आले होते तसेच त्यांचा भ्रमणध्वनी उपलब्ध करुन देण्यात आला होता.

शासन पत्र क्र. संकीर्ण-१११८/ प्र.क्र.२४/ १८/तांशि-७, दिनांक २० जुलै, २०२२. च्या शासन पत्रान्वये शासनाने महापार ऑनलाईन प्रणालीत कार्यमुल्यमापन अहवाल दिनांक ३०/०७/२०२२ पर्यंत पूर्ण करण्याबाबत सूचित केले होते. त्या नुसार संचालनालयाने दिनांक २२/०७/२०२२ च्या पत्रान्वये महापार प्रणालीमध्ये कार्यमूल्यमापन अहवाल लिहिण्याची कार्यवाही दिनांक ३० जुलै,२०२२ पर्यंत पूर्ण करण्याचे सूचित करण्यात आले होते. सदर प्रणालीत कार्यवाही करण्याबाबत संचालनालयाने दुरदश्य प्रणालीव्दारे महापार प्रणालीत ऑनलाईन कार्यमुल्यमापन अहवाल कसे भरावयाचे याबाबत प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण देण्यात आलेले आहेत .

E:\C R. Folder\CR 2021-2022 Online\Online Cr Letter.docx

तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय
आवक क्रमांक – 328
दिनांक – 30/08/2022

प्रशिक्षणानंतर दिनांक २५/०८/२०२२ च्या मेलव्दारे महापार प्रणालीत कार्यमुल्यमापन अहवालाची सद्य:स्थितीचा तपशिल सादर करण्याबाबत कळविण्यात आले असता आपण सादर केलेल्या माहितीवरुन सदरची कार्यवाही अद्यापपर्यंत पूर्ण झालेली नसल्याचे स्पष्ट होते . सदर बाब ही अक्षम्य असून सदरची कार्यवाही विहीत मुदतीत आपणांकडून पूर्ण का करण्यात आलेली नाही याबाबतचा खुलासा तात्काळ सादर करावा .

तसेच आपणास कळविण्यात येते की, आपल्या विभागातील गट-अ व गट-ब मधील सर्व अधिकाऱ्यांचे गोपनीय अहवाल महापार प्रणालीत ऑनलाईन पध्दतीने पूर्ण करण्याची कार्यवाही पुढील १० दिवसात पूर्ण करावी अन्यथा सदर प्रकरणी संचालनालाच्या स्तरावरुन आपणास वेळोवेळी सूचना/प्रशिक्षण देऊन सुध्दा कार्यवाही विहीत मुदतीत पूर्ण न झाल्याने आपणाविरुध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्याबाबत शासनास प्रस्तावित करण्यात येईल.

( डॉ. अभय वाघ )
संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई

प्रत :- मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना सविनय सादर.